अपंग व्यक्ती (समानसंधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण ) अधिनियम १९९५ नुसार भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या सेवेतील गट-अ,ब,क व गट-ड मधील पदावर शारीरिकदृष्टया अपंगासाठी केंद्र शासनाने अपंगांच्या पदनिश्चितीबाबत प्रसिध्द केलेल्या यादीनुसार सुयोग्य पदे निश्चित करणेबाबत..

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय, क्र.आपना १०१०/प्र.क्र.२१०/पापु १५
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : २५ नोव्हेंबर, २०१०

वाचा:- १) अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम १९९५ (१९९६ चा-१)

२) शासन परिपत्रक, सा.प्र.वि.क्र. एसआरव्ही १०९८/प्र.क्र.१२/१६-अ,दिनांक २.५.१९९८

३) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र. आपना १००४/प्र.क्र.१५६/पापु १५, दिनांक १३ फेब्रुवारी,२००६.

४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,शासन निर्णय,क्र.न्यायाप्र-२००९/प्र.क्र.५/सुधार-३, दिनांक ०३ ऑगस्ट, २०१०.

प्रस्तावना :-

अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम १ (१९९६ चा-१) हा, अधिनियम दि. ७ फेब्रुवारी १९९६ पासुन लागू झाला आहे. याा कायद्यान्वये अपंगांच्या सर्वांगिण विकासासाठी व त्यानां सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी शासन सेवेत ३ टक्के पदे आरक्षित करण्याची तरतूद आहे. त्याकरीता अपंग व्यक्तीसाठी पदनिश्चिती केलेली आहे. त्यानुसार या विभागाच्या अखत्यारीतीतल भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या सेवेतील गट-अ,ब,क व गट-ड मधील पदावर शारीरिकदृष्टया अपंगासाठी आरक्षण ठेवण्याकरीता संदर्भ क्र.३ येथील दिनांक १३ फेब्रुवारी, २००६ च्या शासन निर्णयानुसार पदनिश्चिती करण्यात आली आहे.

२. शासनाच्या विविध विभागामार्फत अपंगासाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदांच्या पदनिश्चितीमध्ये एकवाक्यता नाही किंवा ती परिपूर्ण नाही, यासाठी अंपग व्यक्तींसाठी सुधारीत पद निश्चिती करणे व त्यानुषंगाने अपंगाची राखीव पदे भरणे या संदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे जनहित याचिका क्र.२२५/२००९ दाखल करण्यात आली आहे. या याचिकेसंदर्भात मा. उच्च न्यायालयाने शासकीय व निमशासकीय सेवेतील पदे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अपंगासाठी सुनिश्चित करणेबाबतचे निर्देश दिले आहेत. त्यास अनुसरुन संदर्भ क्र.४ येथील दिनांक ०३ ऑगस्ट, २०१० च्या शासन निर्णयान्वये सूचित केल्याप्रमाणे या विभागाच्या अखत्यारीतील भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या सेवेतील पदे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना तसेच अपंगांच्या पदनिश्चितीबाबत प्रसिध्द केलेल्या यादीनुसार अपंगासाठी सुनिश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय :-

मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या जनहित याचिका क्र.२२५/२००९ संदर्भात शासकीय व निमशासकीय सेवेतील पदे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अपंगासाठी सुनिश्चित करणेबाबतचे निर्देश दिले असल्याने उपरोक्त संदर्भ क्र.३ येथील दि.१३ फेब्रुवारी, २००६ चा शासन निर्णय रद्द करण्यात येत आहे.

२. अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम १ (१९९६ चा-१) हा, अधिनियम दिनांक ०७ फेब्रुवारी १९९६ पासुन लागू झाला आहे. या अधिनियमच्या अनुषंगाने शासनाने संदर्भ क्र.२ येथील सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०२ मे,१९९८ च्या शासन निर्णयान्वये शासन सेवेत अंध वा अंशत: अंध , कर्णबधीर, चलनवलन विषयक विकलांगता किंवा मेंदूचा आजार या व्याधीने ग्रस्त झालेल्या व्यक्तींसाठी सरळसेवा भरतीमध्ये आरक्षण ठेवण्याच्या सूचना प्रशासकीय, विभागांना निर्गमित केलेल्या आहेत. तसेच संदर्भ क्र.४ येथील सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक ०३ ऑगस्ट, २०१० नुसार शासकीय व निमशासकीय सेवेतील पदे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अपंगासाठी सुनिश्चित करणेबाबतचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेअंतर्गत "अ" "ब" "क" व "ड" या गटात अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे सरंक्षण) अधिनियम १९९५ च्या तरतूदीनुसार केंद्र शासनाच्या कार्यालयात कार्यरत असलेल्या आणि यंत्रणेत समान पदावर कार्यरत असलेल्या पदांसाठी सरळ सेवा भरतीबाबत आरक्षण ठेवण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. शासनाने संदर्भ क्र.४ येथील दिनांक ०३ ऑगस्ट, २०१० च्या परिपत्रकानुसार सूचित केल्याप्रमाणे भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेमधील "अ" "ब" "क" व "ड" गटातील कोणत्या पदासाठी कोणत्या वर्गवारीतील अपंग व्यक्तीसाठी आरक्षण ठेवावे याबाबत शासन खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

(१) अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे सरंक्षण) अधिनियम १९९५, (१९९६ चा-१) या अधिनियमातील कलम ३२ व ३३ नुसार पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या अधिपत्याखालील भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेअंतर्गत गट "अ" "ब" "क" व "ड" मधील विविध संवर्गातील पदांवर अपंगत्वाचे प्रमाण किमान ४० टक्के असलेल्या अपंग व्यक्तींना ३ टक्के पर्यंत फक्त सरळसेवा भरतीमध्ये आरक्षण ठेवण्यात यावे.

(२) संबंधिताकडून उमेदवारांची शिफारस प्राप्त झाल्यावर अशा उमेदवारांस शारिरीक पात्रतेसंबंधात विहित केलेल्या वैद्यकिय मंडळाने प्रस्तावित केल्यानंतरच अशा अपंग व्यक्तींची भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेंतर्गत सेवेत गट "अ" "ब" "क" व "ड" मधील पदावर नियुक्ती करण्यात यावी. या शिवाय खालील निकषानुसार अशा अपंग व्यक्तींची सरळसेवा भरतीने नियुक्ती करण्यात यावी.

अ) संबंधित सेवाप्रवेश नियमाच्या तरतूदीनुसार अर्हता असेल तर

ब) त्या त्या संवर्गातील पदांची कर्तव्य व जबाबदा-या लक्षात घेऊन त्याप्रमाणे वैद्यकीय मंडळाने सक्षम ठरविल्यास,

क ) भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेंतर्गत अंतर्गत गट "अ" "ब" "क" व "ड" मधील विविध संवर्गात सोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविल्यानुसार अपंगत्वाच्या प्रत्येक प्रकारास प्रत्येकी १% या प्रमाणे एकूण ३ % पर्यंत सरळ सेवा भरतीने आरक्षण ठेवून नियुक्ती करण्यात यावी.

(३) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत गट "अ"व "ब" तसेच इतर मार्गाने संचालनालय, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेमार्फत भरण्यात येणारी गट "क" व "ड" गटासाठी सरळसेवा

भरतीने भरावयाच्या पदांसाठी अपंग उमेदवारासाठी शारिरीक पात्रतेचे निकष कोणते असावेत याचा तपशिल सोबतच्या "परिशिष्ट-अ" मध्ये दिलेला आहे. त्या निकषांवर अशा अपंग व्यक्तीची सरळसेवा भरतीने नियुक्ती करण्यात यावी.

(४) पदोन्नतीच्या पदास व एकाकी पदास अपंगाचे आरक्षण लागू नाही.

३. केंद्र शासनाच्या यादीतील पदांव्यतिरिक्त जी पदे संचालनालय, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेच्या आस्थापनेवर आहेत, अशा २१ संवर्गातील पदांचे अपंगांसाठी पद निश्चिती करणेबाबतचे आदेश तज्ञ समितीच्या मान्यतेनंतर स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

४. हे आदेश सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या संदर्भ क्र.४ येथील आदेशान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यांत येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र.२०१०११२५१७१८२१००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

(श.वि.दुर्वे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत :

१. मा. राज्यपाल यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव.
४. मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक.
५. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
६. उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, सर्व.
७. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सर्व
८. वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, सर्व
९. **सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई** (*पत्राने)
१०. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), मुंबई.
११. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), नागपूर.
१२. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. सामान्य प्रशासन विभाग, का.१६ ब, (२ प्रती) मंत्रालय, मुंबई.
१४. वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. विभागातील सर्व कार्यासने
१६. निवड नस्ती पापु-१५

*परिशिष्ट अ*

***भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेतंर्गत गट अ,ब,क व ड मध्ये सरळसेवा भरतीचे नियुक्ती करण्यासाठी केंद्रशासनाच्या निकषांच्या धर्तीवर अपंग व्यक्तींसाठी शारीरिक पात्रतेचे सुधारित निकष.***

***(केंद्र शासनाने अपंगांच्या पदनिश्चितीबाबत प्रसिध्द केलेल्या यादीनुसार)***

***शासन निर्णय*** क्र.आपना १०१०/प्र.क्र.२१०/पापु १५, दिनांक : २५ नोव्हेंबर, २०१० चे सहपत्र

| अ.क्र. | पदनाम | सुयोग्य पदासाठी अपंगाची वर्गवारी |
|---|---|---|
| १ | संचालक | OL. HH. |
| २ | अतिरिक्त संचालक | OL, HH |
| ३ | सहसंचालक | OL, HH |
| ४ | सहसंचालक (अभियांत्रिकी) | OL, HH |
| ५ | उपसंचालक | OL, HH |
| ६ | वरिष्ठ भूवैज्ञानिक | OL, HH |
| ७ | वरिष्ठ लेखाधिकारी / सहाय्यक संचालक (मविवलेसे) | BL .OA. OL. HH. |
| ८ | प्रशासन अधिकारी | OA .OL. HH .B. LV. |
| ९ | सिस्टिम ॲनालिस्ट | OL. BL. OA. HH. B.LV. |
| १० | सहा.प्रशासन अधिकारी | OL. OA. BL. HH. B. LV. |
| ११ | लेखाधिकारी | BL. OA. OL. HH. |
| १२ | वरिष्ठ सांख्यीकी सहाय्यक (नियोजन सहाय्यक + संशोधन सहाय्यक या पदांचे एकत्रिकरण) | OL. BL. LV.HH. |
| १३ | तांत्रिक अधिकारी (सांख्यिकी सहाय्यक व तांत्रिक अधि या पदांचे एकत्रिकरण) | OA. OL. HH. |
| १४ | प्रोग्रामर | OA. OL. BL. HH. B. LV. |
| १५ | सर्वेक्षक | OA. OL. HH |
| १६ | भौगोलिक माहिती प्रणाली अधिकारी (वरिष्ठ आरेखकपद- नविन नांव) | OA. BL. HH |
| १७ | भौगोलिक माहिती प्रणाली वरिष्ठ सहाय्यक (आरेखक- नविन नाव) | OA. BL. HH |
| १८ | भौगोलिक माहिती प्रणाली सहाय्यक (अनुरेखक -नविन नाव) | OL. OA. BL. HH. |
| १९ | प्रयोगशाळा सहाय्यक | OL. HH |
| २० | कार्यालय अधिक्षक | OL. OA. BL. HH. B. LV. |
| २१ | वरिष्ठ लिपिक (वरिष्ठ लिपिक+भांडारपाल+ वरिष्ठ लेखा लिपिक पदांचे एकत्रिकरण) | OA. OL. BL.OAL. B.LV. HH. |
| २२ | कनिष्ठ लिपिक | OA.OL .BL. OAL. B. LV. HH |
| २३ | उच्चश्रेणी लघुलेखक | OL. BL. OA. B. LV. |
| २४ | लघुलेखक | OL. BL. OA. B. LV. |
| २५ | लघुटंकलेखक | OA. OL. BL. OAL. B.LV. |
| २६ | उपलेखापाल | OA. OL. OAL. BL. HH. |
| २७ | रोखपाल | OA. BL. OL. MW. |
| २८ | दूरध्वनीचालक | OA. OL. BL. B. LV. |
| २९ | कनिष्ठ अभियंता | OL. HH |
| ३० | यांत्रिकी (यांत्रिकी + वीजतंत्री या पदांचे एकत्रिकरण) | OL. HH |
| ३१ | शिपाई | OL. HH. LV. /B.OA |
| ३२ | पहारेकरी | OL. |
| ३३ | मदतनीस | OL. HH. LV. |

**ABBREVATIONS USED** :- S=Sitting, BN= Bending, SE= Seeing, RW = Reading & Writing C=Communication] MF=Manipulation by Fingers, PP=Pulling & Pushing, L=Lifting KC=Kneeling & Croutching, ST=Standing, W=Walking, BLA=Both Legs & Arms, BA=Both Arms, OL=One Leg. BL=Both Leg. OA=One Arm, OAL= One Arm and One Leg. B=Blind, LV=Low Vision, H=Hearing, MW= Muscular Weakness. OH= Orthopaedically Handicapped, CP=Cerebral Palsy, LC=Leprosy Cured, VH= Visually Handicapped, HH=Hearing Handicapped.